# मेट्रो३च्या पाठीवर 'मेट्रोमॅन'ची थाप

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

- मेट्रो ३ प्रकल्पाच्या गतीबाबत ई. श्रीधरन यांचे कौतुकोद्गार
- एमएमआरसीएलने स्वतःचा बँड निर्माण करावा, अशी अपेक्षा

कुलाबा-वांद्रे-सीप्झ हा भूमिगत मेट्रो-३ मार्ग देशातील आव्हानात्मक मेट्रो मार्ग असून सर्व आव्हानांचा सामना करत या प्रकल्पाने घेतलेली गती कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत 'मेट्रो मॅन' ई. श्रीधरन यांनी मेट्रोच्या कामाचे कौतुक केले. जगातील अन्य देशात जेव्हा मेट्रोची कामे निघतील, तेव्हा ते काम मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला (एमएमआरसीएल) मिळाले पाहिजे, त्यादृष्टीने कॉर्पोरेशनने आपला ब्रँड तयार करावा, अशी महत्त्वाची सूचनाही त्यांनी केली.

भारतातील सार्वजनिक वाहतुकीचा चेहरामोहरा बदलून टाकण्यात मोठे योगदान असलेल्या ई. श्रीधरन यांनी मरोळ नाका व पाली नाका येथे मेट्रोच्या बांधकामाची पाहणी केली. त्यांच्या समवेत मेट्रो-३ चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हा प्रकल्प देशातील सर्वात कठीण, आव्हानांनी युक्त आणि तांत्रिकदृष्ट्या किचकट असा प्रकल्प आहे. अशा प्रकल्पावर काम करण्यास मिळणे हे भाग्याचे आहे. त्यादृष्टीने या प्रकल्पाशी संबंधित सगळी मंडळी ही भाग्यवान आहेत. या प्रकल्पामुळे त्यांना अत्यंत वैविध्यपूर्ण अशा कामाचा अनुभव मिळत असून या अनुभवाचा मोठा फायदा त्यांना भविष्यात होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रकल्पाच्या निमित्ताने एमएमआरसीएलकडे खूप मोठी जबाबदारी आली आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे लागले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देशात किंवा जगात कुठे मेट्रोची कामे निघाली, तर या कामासाठी एमएमआरसीएलला प्राधान्य मिळाले पाहिजे. त्यादृष्टीने एमएमआरसीएलने आपला ब्रँड तयार करावा, अशी महत्त्वाची सूचना त्यांनी अधिकाऱ्यांपुढे बोलताना व्यक्त केली.

हा प्रकल्प राबवताना असंख्य आव्हाने होती. या सर्व आव्हानांचा यशस्वी मुकाबला करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या मार्गातील ९५ टक्के समस्या निकालात काढण्यात एमएमआरसीएलला यश आले असून सध्या प्रकल्पाचा वेग कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत त्यांनी एमएमआरसीएलचे कौतुक केले.

कोकण रेल्वे आणि दिल्ली मेट्रोच्या उभारणीत सिंहाचा वाटा असणारे श्रीधरन हे लखनौ, कोची आणि जयपूर मेट्रो रेल्वेचे मुख्य सल्लागार आहेत.



## आर्थिकदृष्ट्या सक्षम

कोणताही प्रकल्प वेळेत पूर्ण नाही झाला, तर मोठे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होणे गरजेचे असते. त्याचबरोबर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम असणेही तेवढेच महत्त्वाचे आहे, असा मंत्र त्यांनी दिला.